**राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(८)(क) अन्वये**

**आदेश**

विषय :- **पोलीस ठाण्यांच्या स्तरावरील जतन केलेला अभिलेख, त्याचे वर्गीकरण तसेच सी.सी.टी.व्ही.फुटेज प्राप्त होण्याविषयी.**

राज्य माहिती आयोगाकडे पोलीस विभागाशी संबंधित अनेक माहिती अर्जांबाबत द्वितीय अपील अर्ज प्राप्त होत असतात. त्यामध्ये , पोलीस ठाण्याच्या स्तरावर जतन करण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या अभिलेखांबाबत माहिती विचारली जाते. अशावेळी माहिती देण्यासंदर्भात अनेकदा उपलब्ध अभिलेखांबद्दल स्पष्टता दिसून येत नाही. तसेच, तेथील असा अभिलेख किती कालावधीकरिता जतन करावयाचा आहे याबद्दलही संदिग्धता असते. अलिकडे शासनाने अनेक पोलीस ठाण्यामध्ये सी.सी.टी.व्ही. यंत्रणा उपलब्ध करून दिली आहे. इलेक्ट्रॉनिक रेकॉर्ड म्हणून त्याच्या फुटेजची मागणी केली जाते. तथापि, यंत्रणेमध्ये बिघाड आहे किंवा यंत्रणेमध्ये अत्यंत मर्यादित कालावधीपुरता डेटा जतन होत असल्याने अपेक्षित फुटेज उपलब्ध नाही, अशी उत्तरे अनेकदा दिली जातात. फुटेजची प्रत कशी द्यावी, हा प्रश्नही असतो. शासनाने किंवा पोलीस महासंचालक कार्यालयाने तसेच बृहन्मुंबई पोलीस आयुक्त व जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयामार्फत पोलीस ठाण्याच्या स्तरावर जतन करावयाचे अभिलेख, उदा. डायऱ्या व नोंदवह्या यामध्ये स्पष्टता यावी, त्या सर्वांचे वर्गीकरण स्पष्ट व्हावे तसेच, सी.सी.टी.व्ही.यंत्रणेच्या फुटेजबद्दलदेखील एकरूपता यावी, म्हणून शुक्रवार, दि. ३ जून,२०१६ रोजी राज्य माहिती आयोगामध्ये गृह विभाग,पोलीस महासंचालक कार्यालय बृहन्मुंबई पोलीस आयुक्त कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी यांचे समवेत बैठक झाली.

सदर बैठकीमध्ये, उपस्थितांच्या सहमतीने असा निर्णय झाला की, पोलीस ठाण्याच्या स्तरावर ठेवावयाच्या अभिलेखाबाबत व जतन करावयाच्या कालावधीबाबत (वर्गिकरणाबाबत) पोलीस महासंचालक कार्यालयामार्फत समर्वसमावेशक आदेश पारीत व्हावेत. तसेच, सी.सी.टी.व्ही.यंत्रणेचे फुटेज किती कालावधीपर्यंत ठेवणे आवश्यक आहे व फुटेजची प्रत मिळण्याकरिता अवलंब करावयाची प्रक्रिया स्पष्ट करणारे आदेश पारीत व्हावेत. यावेळी अशीही चर्चा झाली की, नागरिकांचे अनेक अर्ज त्यांनी दाखल केलेल्या तक्रार अर्जावर झालेल्या कार्यवाहीचा अद्ययावत माहितीकरिता (States)असतात. सर्वसाधारणपणे ज्या प्रकरणी , एफ.आय.आर. नोंदविले जातात तेथे तपास कार्य चालू असल्यामुळे माहिती देता येत नाही, असे ठराविक उत्तर दिले जाते व तपास कार्य पूर्ण झाल्यावर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे म्हणून तक्रारकर्त्यांना माहिती मिळत नाही.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या प्रस्तावनेमध्येच, सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामामध्ये अधिकाधिक पारदर्शकता व उत्तरदायित्व निर्माण करण्याच्या दृष्टीने सदर कायदा करण्यात आला आहे असा उल्लेख आहे. मा. सर्वोच्च न्यायालयानेदेखील त्यांच्या अनेक आदेशामध्ये या बाबीवर विवेचन केले आहे.

वरील पार्श्वभूमीवर शासनातील गृह विभागाने व पोलीस महासंचालक कार्यालयाने एक प्रपत्र निश्चित करावे. ज्यामध्ये, विशेषकरून तक्रारकर्त्यांना त्यांच्या तक्रारीवर होत असलेल्या कार्यवाहीची स्पष्ट माहिती मिळू शकेल. मात्र, तपासकार्यामध्ये बाधा येईल अशी माहिती दिली जाऊ नये, याची आयोगाला पूर्ण जाणीव आहे व याकरिता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८ (१) ( छ ) व (ज) मध्ये पुरेशी तरतूद करण्यात आलेली आहे.

उपरोल्लिखित चर्चेच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम कलम १९(८)(क) अन्वये आयोग अपर मुख्य सचिव (गृह) गृह विभाग व पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य आणि पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांना असे निर्देश देत आहे की, त्यांनी एका महिन्याच्या आत उक्त विषयावर संपूर्ण राज्यात पोलीस ठाण्याच्या स्तरावर जतन करावयाचा अभिलेख,उदा. डायऱ्या , नोंदवह्या यांची यादी, त्याचे वर्गीकरण व जतन करावयाच्या कालावधीची माहिती आणि सी.सी.टी.व्ही.यंत्रणेच्या फुटेजसंदर्भात मार्गदर्शिका व नागरिकांना द्यावयाच्या माहितीबद्दल प्रपत्र निश्चित करून परिपत्रक पारित करावे व त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे व आयोगाला याबद्दलचा अनुपालन अहवाल शनिवार, दि. ३०.०७.२०१६ पर्यंत सादर करावा.

(रत्नाकर य. गायकवाड)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

१.अपर मुख्य सचिव,गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
२.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा मुंबई ४०००३९
३.पोलीस आयुक्त, क्राफर्ड मार्केट, मुंबई ४०० ००१

ISSUED
Date 13/06/16
Signature